लोकमत

# बहुविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : आंतरविद्याशाखीय ज्ञानार्जनाचे महत्त्व आज नव्याने अधोरेखित झाले आहे. त्याच्या बरोबरीनेच आता विविध विद्याशाखांतील संशोधकांनी एकत्र येऊन संशोधन प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे. यात केवळ विज्ञान विद्याशाखाच नव्हे,तर तिच्या जोडीने सामाजिक शास्त्रज्ञांचाही सहभाग असणे आवश्यक झाले आहे. त्या दृष्टीने बहुविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्याची गरज प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांनी मांडली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात आयोजित चार दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ.ए.ए.देशमुख यांनी कार्यशाळेचा आराखडा आणि महत्व सांगितले.

27 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुविद्याशाखीय संशोधनास चालना आवश्यक

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; विद्यापीठात राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बहुविद्याशाखीय संशोधनास चालना देणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे, असे मत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात 'मॉलेक्युलर टेक्निक्स इन बायोलॉजिकल रिसर्च' या विषयावर आयोजित चार दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आंतर विद्याशाखीय ज्ञानार्जनाचे महत्त्व आज नव्याने अधोरेखित झाले आहे. आता विविध विद्याशाखांतील संशोधकांनी एकत्र येऊन संशोधन प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे. यात केवळ विज्ञान विद्या शाखाच नव्हे, तर तिच्या जोडीने सामाजिक शास्त्रज्ञांचाही सहभाग असणे आवश्यक झाले आहे. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख यांनी कार्यशाळेचा आढावा घेतला. कार्यशाळेतील प्रशिक्षणाची माहिती समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी दिली. कार्यशाळेसाठी पुणे, सांगली, सातारा, औरंगाबाद आदी विविध महाविद्यालयांतून ३५ संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले आहेत.